**1S5** **EE1**

**D.El.Ed. Examination**
**JANUARY, 2023**
# MODEL ANSWER AND SCHEME OF MARKING
**Second Year (2016 Revised Syllabus)**
**PEDAGOGY OF LANGUAGE (II Language)**
**MARATHI**
**Time : 3.00 to 5.00 Hrs.**

**Date : 14/01/2023** **(20 Pages)** **Max. Marks : 40**

सूचनेनुसार प्रश्नांची उत्तरे लिहा :

(अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा : 4

(1) संस्कृतीचे अविभाज्य अंग कोणते ? 1

भाषा हे संस्कृतीचे अविभाज्य अंग होय.

(2) 'भाष्' हा कोणत्या भाषेतील मूळ धातू आहे ? 1

'भाष्' हा संस्कृत भाषेतील मूळ धातू आहे.

(3) गतिवाचन म्हणजे काय ? 1

कमीत कमी वेळात जास्तीत जास्त वाक्ये अर्थ जाणून घेऊन वाचणे म्हणजे गतिवाचन होय.

(4) सामाजिक ऐक्य कशामुळे विकसित होते ? 1

भाषेमुळे सामाजिक ऐक्य विकसित होते.

(ब) जोड्या लावा : 4

| 'अ' गट | | 'ब' गट | |
|---|---|---|---|
| (1) आधार पद्धती | – | इतिहास | 1 |
| (2) प्रतिकृती | – | शैक्षणिक साधन | 1 |
| (3) मराठीची जननी | – | संस्कृत | 1 |
| (4) भाषा शिक्षणाचा पाया | – | श्रावण | 1 |

2. **खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *40* ते *80* शब्दांत लिहा :** 8

(1) **मानवी जीवनात भाषेचे स्थान सांगा :** 2

मानव हा भाषेचा सार्वत्रिक उपयोग करणारा प्राणी आहे. प्रत्येक प्राणी काही ना काही शब्द काढतो व त्याच्या दृष्टीने त्यांना काही अर्थही असतो. भाषा हे संपूर्ण मानव जातीला सर्वश्रेष्ठ मिळालेले वरदान होय. त्याचे सर्वच जीवन भाषेने व्यापले आहे. मानवी जीवनातील सर्व व्यवहार भाषेवरच अवलंबून आहेत. भाषेच्या अंगभूत सामर्थ्यामुळेच मानवी जीवनात भाषेला एवढे महत्त्व आले आहे. मातृभाषा ही हृदयाची भाषा होय. म्हणून भाषा व मानव यांचा संबंध अतूट आहे.

(1) **परस्परसंबंध** – भाषेमुळे मानवांचा संबंध अतूट राहतो. एक कुटुंब, धर्म, पंथ, संस्कृती ही भाषेमुळेच टिकून राहते. भाषेमुळेच मनुष्य आपले मनोगत व्यक्त करतो.

(2) **आर्थिक व राजकीय व्यवस्था** – दैनंदिन जीवनातील आर्थिक बाबी आणि राजकीय पक्षांची धोरणे ही भाषेद्वारेच मांडली जातात.

(3) **विचारांची देवाणघेवाण** – विचारांचे आदान-प्रदान होऊच शकत नाही.

(4) **समाजनिर्मिती** – भाषेने आपल्याला अंतर्बाह्य व्यापून टाकले आहे. आपण एकत्रित आलो असता तेथे आपले विचार, सुख-दु:ख, द्वेष इत्यादी भावना शब्दांद्वारे प्रगट करतो. जीवनाचे सर्व व्यवहार भाषेच्या साहाय्यानेच करतो. हीच भाषा मानवांचा एकत्र आणून त्यांचा समाज निर्माण करते. हा समाज एकत्र बांधून ठेवण्याचे महान कार्यसुद्धा भाषाच करते.

(5) **संस्कृती** – भाषेमुळेच आपली मूळ परंपरा कळते व ती टिकून राहते. आचार व धर्म कल्पना कळतात. त्यामुळे संस्कृती टिकून राहते. संस्कृती संरक्षणाचे व संवर्धनाचे कार्य भाषाच करते.

(6) **भावना व विचार** – मानव आपले विचार व भावना, सुख-दु:ख आशा-आकांक्षा, क्रोध, प्रेम भाषेद्वारेच होते.

(7) **सामाजिकता** – भाषेमुळे आपले मानवी जीवन पोसलेले आहे आणि भाषेमुळेच सामाजिकता साधते.

(8) **एकात्मता** – भाषेमुळेच आपल्यास राष्ट्रीय एकात्मतेची जाणीव होते.

**किंवा**

**आधुनिक अध्यापन पद्धतीमध्ये झालेला बदल स्पष्ट करा :**

मराठी भाषेचा शिक्षक हाडामासाचा कलावंत असतो. त्याला कथा, काव्य, निबंध, व्याकरण यांचे अध्यापन करतांना अनेक भूमिकेतून जावे लागते. त्यामुळे शुद्धवाणी, शुद्धलेखन, मराठी भाषेवर प्रभुत्व, साहित्याची आवड, रसिकता, सृजनशीलता इ. गुण मराठी विषय शिक्षकाच्या अंगी असले पाहिजे. अध्यापन पद्धतीत झालेला बदल.

(1) आशययुक्त अध्यापनाचा उपयोग केल्या गेला.

(2) मूल्ये, गाभाघटक, क्षमता, जीवनकौशल्ये यांचा समावेश अध्यापनात आणण्याचा प्रयत्न केला.

(3) अध्यापनात अध्यापनाच्या प्रतिमानाचा स्वीकार करण्यात आला.

(4) विद्‌यमान अभ्यासक्रम ज्ञानरचनावादावर असल्याने क्रमप्राप्त आहे.

(5) एल.सी.डी. कॅसेट, पी.पी.टी., वेबसाइट्स यांचा वापर अधिक होत आहे.

**(2) मराठी भाषा विकसनात व्याकरणाचे महत्त्व स्पष्ट करा :** 2

(1) माणसाच्या व्यवहारातून व बोलण्यातून मराठी भाषा विकसित झाली.

(2) व्याकरण हे भाषेच्या विकासानंतर साकार होत गेले. मराठी भाषेत शब्दसंपत्तीची भर पडत गेली.

(3) व्याकरणकारांनी शब्द, वाक्य यांची बदलती रूपे पाहून वर्गीकरण केले आणि वाक्याच्या निरीक्षणातून नियम तयार केले. याच नियमावरून भाषेला महत्त्व प्राप्त झाले.

(4) मराठी भाषा तिच्या नियमांसह निर्माण झाली आहे.

(5) मराठी भाषेमध्ये बदल होतात. तिच्या स्वरूपात बदल होणे हे जीवंतपणाचे लक्षण आहे.

(6) मराठी भाषा आणि व्याकरण हे परस्परांमध्ये व परस्परांवर अवलंबून असतात.

(7) मराठी भाषा ही स्थळ काळानुरूप बदलत जाते. भाषेच्या बदलांमुळे व्याकरणाला. शरणागती पत्कारावी लागते. नियमांना मुरड घालावी लागते.

किंवा

**मूल्यमापन म्हणजे काय ? स्पष्ट करा :**

मूल्यमापन या शब्दाला Evaluation असा शब्द वापरला जातो. शिक्षणातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा असा शब्द वापरतात. शिक्षणातून विद्यार्थांच्यामध्ये हा सर्वांगीण बदल आपण अपेक्षित करतो. त्यालाच आपण अपेक्षित करतो, त्यालाच शैक्षणिक उद्दिष्टे म्हणतो. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबरच त्यांच्या ठिकाणी विविध गुणांचा विकास व्हावा अशी अपेक्षा असते आणि मुलांमध्ये आपण जो बदल अपेक्षित असतो त्यालाच शैक्षणिक उद्दिष्टे म्हणतात. ही उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य झाली हे ठरविण्यासाठी उपयोजिलेली सूत्रबद्ध पद्धती म्हणजेच मूल्यमापन होय. यामध्ये विद्यार्थ्यांचे वर्तन व प्रगती यांचे गुणात्मक आणि संख्यात्मक चित्र दिसते. निश्चित केलेली शैक्षणिक उद्दिष्टे साध्य झाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित वर्तन–परिवर्तन झाले किंवा नाही यासाठी चाचणी घेणे. त्या निकालाचे विश्लेषण करणे होय.

(3) **अभ्यासक्रम रचनेच्या पद्धती स्पष्ट करा :** 2

विविध पद्धतीने अभ्यासक्रमातील घटकाची रचना करता येते.

(1) **मानसशास्त्रीय दृष्टिकोन** – अभ्यासक्रम तयार करतांना विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता वयोगट व मानसिक क्षमता यांचा विचार करून घटक निश्चित करावे. भाषेसाठी ही पद्धत उपयुक्त ठरते कारण घटकांची काठिण्य पातळी विचारात घेऊन त्याची निवड व मांडणी असेल तर अभ्यासक्रम चांगला होतो.

(2) **उपक्रमनिहाय** – अभ्यासक्रमाचे मूलतत्त्व हे 'कृतिद्वारे शिक्षण' आहे. उपक्रमनिहाय अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांशी संबंधित वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम समाविष्ट केलेले असतात.

(3) **घटक पद्धती** – समानगुण धर्मांचे विभाग एकत्र करून सोईचे घटक तयार करणे यामुळे उपघटकानुसार अध्यापन सोईचे व परिणामकारक होते. भाषा, शास्त्र, गणित या विषयांना ही पद्धती सोईचे होते.

(4) **अनुभव संपन्न** – विद्यार्थ्यांच्या गरजा, अभिरुची यांना पुरेसा वाव देवून समाजाच्या प्रगतीसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करून देणारा हा अभ्यासक्रम असतो.

(5) **विषयनिहाय** – अभ्यासक्रम विद्यार्थ्याला परीक्षार्थी बनवितो. शिक्षक आणि पाठ्यपुस्तक या दोन्ही गोष्टींना विशेष महत्त्व दिले जाते. या प्रकारच्या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांच्या गरजा आणि क्षमता यांचा विचार केलेला आढळत नाही.

4) **अध्यापन हे शास्त्र की कला ? उदाहरणासहित सांगा.** 2

शैक्षणिक तत्त्वज्ञानाने निश्चित केलेली उद्दिष्टे कशी साध्य करायची, कोणत्या अध्यापन पद्धतीचा विचार व अवलंब करायचा. अध्यापन परिणामकारक व्हावे म्हणून कोणते प्रयत्न करायचे ? हा विचार अध्यापनशास्त्राला करावा लागतो. शास्त्राचे नियम निश्चित असतात. त्या कसोटीवर आपले ज्ञान तपासून घ्यावे लागते. अध्यापन करतानाही आपणास शिक्षणशास्त्राची व अध्यापनशास्त्राची मूलभूत तत्त्वे, नियम, सिद्धांत आदींचा शास्त्रीय विचार करावा लागतो. म्हणूनच अध्यापन हे शास्त्र होय.

अध्यापन ही कला अध्यापकाचे शास्त्र एखाद्यास मुखोद्गत आहे पण वर्गात गेल्यावर जर त्याच्या तोंडून शब्दच बाहेर पडत नसेल, तर त्या ज्ञानाचा उपयोग काय ? एखाद्याला शास्त्र माहित नाही, पण त्याचा वर्ग नेहमीच जिवंत असतो. मुले आनंदित असतात. प्रतिसाद बरोबर देतात हे का ? कारण त्यांचे शिकविणेच एवढे कलापूर्ण असते की, त्या सगळे शास्त्रीय नियम अनवधानाने का होईना,

पाळले जातात आणि अध्यापनाचे शास्त्र तरी कसे बनले ? आधी भाषा झाली व मग सुबद्ध रचने वरून व्याकरण लिहिल्या गेले. तसेच अध्यापनशास्त्राचे आधी शिकविण्यातील चांगली तत्त्वे पाहिल्या गेली व पुढे त्याचे शास्त्र बनले. म्हणून अध्यापन ही आधी कला आहे. कला नेहमी सौंदर्याभिमुख असते. कला ही नवनवोन्मषशालिनी असते. सौंदर्याच्या पंखावर बसून कल्पना साम्राज्यात विहार करणे हा तिचा धर्म आहे. म्हणूनच अध्यापनातही सौंदर्य असते.

**किंवा**

**भूमिका अध्ययन पद्धती म्हणजे काय ?** 2

भूमिका अभिनय ह्यातच त्याचा अर्थ आहे. एका विशिष्ट भूमिकेला साकार करण्याचा विद्यार्थी प्रयत्न करतो. भूमिका अभिनयामध्ये कोणत्याही तयारी व सरावाशिवाय पाठातील कोणताही प्रसंग नाट्यीकरणाने सादर करण्याच्या विद्यार्थी प्रसंग सादर करतो व त्यातूनच अध्यापन घडते नाट्यीकरणात विद्यार्थी स्वत: प्रसंग सादर करतांना त्यातील भूमिका वाढवितात भूमिका अभिनयात हा विद्यार्थ्यांच्या आवडीचा विषय आहे. यामधून विद्यार्थ्यांला काही भूमिका साकारायची असते व आत्मविष्काराची संधी मिळते. विद्यार्थ्यांच्या सुप्त इच्छा-आकांक्षा, समस्या, चिंता, व्यथा, विकृती यांना वाट मिळते. विद्यार्थ्यांला काही भूमिका व सुप्त भावनांच्या अविष्कारामुळे जो भावनिक कोंडमारा होतो त्यास वाट मिळते. सामाजिक, कौटुंबिक, सार्वजनिक विषयभूमिका अभिनयातून उत्तमपणे मांडता येतात.

**3. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *120* ते *180* शब्दांत लिहा :** 12

(1) **श्रवणक्षमता विकसित करण्यासाठी शालेय उपक्रम सुचवा :** 3

श्रवणक्षमता विकसित करण्याकरिता भाषा शिक्षकाने काही तंत्रे शिकून घ्यायला हवीत. त्यात कथन, विवेचन, नाट्यीकरण तंत्रांचा समावेश होतो.

(1) **कथनकौशल्य** – कथन हाही वर्णनाचाच एक भाग, पण तेथे एखादी घटना किंवा कथा सांगावी लागते. त्याला मुलांच्या आवडी-निवडी व भावना लक्षात घेऊन गोष्टी निवडाव्या लागतात त्या निवडतांना मुलांचे वय लक्षात घ्यावे लागते.

(2) **वर्णनकौशल्य** – वर्णनात एक लय असावी. शब्दोच्चार स्पष्ट असावेत. आवाजात योग्य चढउतार असावा व भाषा रंजक असावी त्यामुळे आपण मुलांचे श्रवणसामर्थ्य विकसित करू शकतो.

(3) **विवेचनकौशल्य** – विवेचन ही जरा वरची पायरी यासाठी थोडी-अधिक बौद्धिक पात्रता हवी. कारण यात साधक-बाधक चर्चा करावयाची असते सिद्धांत मांडायचे वा खोडायचे असतात. विवेचन हे तर्कसंगत व सुसंगत असावे.

(4) **नाट्यीकरण** – नाट्यीकरणाने बालकाच्या भाषेचा विशेष अंगाचा परिचय होतो.

कोणताही शब्द उच्चारताच त्यामागील अर्थभाव एकदम लक्षात येण्याच्या दृष्टीने त्याचा उच्चार कसा करावा. त्या उच्चाराला पोषक अशा स्वरात चढ-उतार कसा व ते विचार वा भाव चेहऱ्यावर प्रतिबिंबित होण्याच्या दृष्टीने कोणते हावभाव करावेत या सर्व गोष्टी नाट्यीकरणाने शिकविता येतात.

(5) **भाषिक खेळ** – वर्गात व शाळेतही खेळांच्या स्पर्धा घेता येतात. उदा. शब्दसंपत्ती, समानार्थी शब्द, वक्तृत्व स्पर्धा, भेंड्या, सरगम आदी खेळांतून श्रवणक्षमता विकसित होण्यास मदत होते.

(6) **सुस्वर वाचन** – सुस्वर वाचन केल्यामुळे वाचनाची गती, आरोह-अवरोह, शुद्ध व स्वच्छ उच्चार, अभिनय या गोष्टींची परिणामकारकता साधली तर श्रवणक्षमता विकसित करण्यासाठी उत्तम उपयोगी होईल.

(7) **श्राव्य कार्यक्रम ऐकण्याची संधी** – आकाशवाणी वरील कार्यक्रम, चांगली भाषणे, रेडिओ नाट्य, टेप केलेली भाषणे, काव्यवाचन, कथाकथन उत्कृष्ट वक्त्यांची भाषणे ऐकण्याची संधी असे कार्यक्रम विद्‌यार्थ्यांचे श्रवणकौशल्य विकसित करतील.

**किंवा**

**वाचनक्षमता विकसित करण्यासाठी तुम्ही कोणती उपाययोजना कराल ?**

वाचनक्षमता विकसित करण्यासाठी शाळा, शिक्षक, पालक या सर्वांनी मुलांना वाचन सराव दिला पाहिजे. शिक्षकांनी वाचनातील दोष सांगून सुधारणा कराव्यात. पालकांनी सुद्धा रोज आपल्या मुलांकडून वाचन करून घ्यावे.

वाचनक्षमता विकसित करण्यासाठी उपाययोजना :

(1) विद्यार्थ्यांचे वाचन अक्षरतक्ते, शब्दपट्ट्या, वाक्यपट्ट्या यांच्या साहाय्याने घ्यावे.

(2) क्रमिक पाठ्यपुस्तकातील पाठांचे वाचन व अनुवाचन घेणे.

(3) पाठ्यपुस्तकातील कवितांचे लयीत वाचन घेणे.

(4) मुलांच्या परिसरातील दुकानाच्या पाट्या वाचून येण्यास सांगणे व काय वाचले ते वर्गात विचारणे.

(5) शब्दचित्र मालिका व भित्तिपत्रके यांचे घरात वाचन व वर्गात वाचन घेणे.

(6) पाठ्यपुस्तकातील चित्रांचे वाचन करवून घेणे.

(7) मुलांना वर्गात वाचनाची संधी देणे.

(8) कथा सांगणे, कविता वाचन, निबंध वाचन याचे आयोजन.

(9) वृत्तपत्रे, मासिके यांचेही वाचन करून घ्यावे.

(10) भाषेचे खेळ, भेंड्या, पाठांतर स्पर्धांचे आयोजन करावे.

(2) **पाठ्यपुस्तकाचे अंतरंग स्पष्ट करा :** 3

मातृभाषा शिक्षणाची उद्दिष्टे प्रत्येक स्तरानुसार वेगळी आहेत. इ. 1 ते 5वी, 6वी ते 7वी, 8वी, ते 10वी या तीनही स्तरांची मातृभाषेची उद्दिष्टे साध्य करण्याचे साधन म्हणजे पाठ्यपुस्तक होय. भाषिक उद्दिष्टानुसार या स्तराच्या विद्यार्थ्यांमध्ये काही क्षमतांचा विकास व्हावा अशी अपेक्षा असते प्राथमिक स्तरावरील मराठीच्या पाठ्यपुस्तकातून श्रवण, भाषण, वाचन, लेखन, संभाषण, पाठांतर इ. क्षमतांचा विकास होणारे गद्य व पद्य, पत्रे व स्वाध्याय असणे आवश्यक आहे. पाठ्यपुस्तकाची रचना काही उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी केली जाते. ही उद्दिष्टे मराठीच्या पाठ्यपुस्तकातून पूर्ण व्हावीत भाषिक व वाङ्मयीन मूल्ये ...... भाषेच्या पुस्तकातील वेचे निवडतांना ते भाषेचे पुस्तक आहे हे लक्षात घेणे गरजेचे आहे. वेगवेगळ्या विषयांची माहिती देणे हा भाषेच्या तर पुस्तकात येणे गरजेचे आहे.

(1) भाषेचे ज्ञान होणे.

(2) भाषिक सामर्थ्य वाढविणे.

(3) भाषिक क्षमतांचा विकास होणे.

(4) मराठी वाङ्मयाचा परिचय होणे.

(5) मराठी भाषेचा विकास लक्षात घेणे.

(6) मराठी साहित्याच्या रसास्वादाची पात्रता निर्माण करणे.

(3) **शिक्षण म्हणून कोणकोणत्या अध्यापन तंत्राचा अध्यापनात वापर कराल ?** 3

अध्यापन प्रभावी होण्यासाठी शिक्षकाने अध्यापनात तात्पुरता केलेला कौशल्यपूर्ण बदल म्हणजे अध्यापनाचे तंत्र होय. शिक्षकाचे अध्यापन व विद्यार्थ्यांचे अध्ययन प्रभावी होण्यासाठी अनेक तंत्राचा विचार अध्यापनात करावा लागेल :

(1) **भाषिक खेळ** – विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती वाढविण्यासाठी, तसेच भाषेवर प्रभुत्व मिळविण्यासाठी, भाषेचा गर्भित अर्थ समजण्यासाठी, भाषिक विकास होण्यासाठी भाषिक खेळाची गरज असते.

(अ) **शब्दांच्या भेंड्या** – भेंड्या हा विद्यार्थ्यांच्या आवडीचा खेळ होय. गावाची नावे. शहराची नावे, विरुद्धार्थी शब्द, समानार्थी शब्द याप्रकारे पहिल्या व शेवटच्या अक्षरावरून हा खेळ खेळला जातो. दोन गटात भेंड्या खेळल्या जातात. व्याकरणाचे घटक, नाम, सर्वनाम इ. सुद्धा भेंड्यात घेता येतील.

(ब) **वाक्प्रचाराचा अर्थ सांगणे** – एका गटाने वाक्प्रचार सांगणे व दुसऱ्या गटाने वाक्प्रचाराचा अर्थ सांगणे असाही खेळ खेळता येईल. यामधून विचारप्रक्रियेला चालना मिळेल.

(क) **माहीत असलेले शब्द सांगणे** – यामध्ये हात वर करून माहीत असलेले शब्द भराभरा सांगणे. प्रश्नोत्तरे-ही अध्यापनाची पद्धत जरी असली तरी शिक्षक व विद्यार्थी दोघेही सक्रिय राहतात.

**किंवा**

**सहयोगी अध्यापन पद्धतीचे फायदे लिहा :**

सहयोगी अध्यापन ही एक-एक विद्यार्थीकेन्द्रित अध्यापनाची पद्धती आहे. यामध्ये विद्यार्थी सक्रिय असतात. यामध्ये 2-2 विद्यार्थी गट केले जातात. दोन विद्यार्थ्यांच्या गटाला जर विशिष्ट काम दिले आणि त्याचे दोन भाग केले आणि सादरीकरण करायला लावले तर दोघांमधील चर्चा, विचारविनिमय व परस्पर आकलनाद्वारे अध्ययन-अध्यापन प्रभावी होऊ शकते. हाच सहयोगी अध्यापनाचा मुख्य हेतू असतो.

**फायदे :**

(1) सहयोगी अध्ययनातून विचार, भावना व कृती याला चालना मिळते.

(2) विद्यार्थी विचार करू लागतात.

(3) कोणत्याही परिस्थितीमध्ये अध्ययन घडते.

(4) न्युनगंड कमी होतो.

**सहयोगी अध्यापन पद्धती स्वरूप –**

(1) या पद्धतीमध्ये दोन किंवा त्यापेक्षा अधिक विद्यार्थी एकत्र तयार केलेली परिस्थिती होय.

(2) एकमेकांच्या मदतीने अभ्यास केला जातो.

(3) अनेकजण एकत्र येऊन ज्ञानाची निर्मिती करतात.

(4) शिकण्यायोग्य वातावरण तयार केले जाते.

(5) समोरासमोर चर्चांचा समावेश होतो.

(6) अध्ययनासाठी गटांची निवड केली जाते.

**किंवा**

कथन प्रभावी होण्यासाठी तुम्ही शिक्षक या नात्याने कोणते उपक्रम आयोजित कराल ? ते लिहा.

कथन करणे म्हणजे सांगणे. कथन याला Narration असे म्हणतात. वर्गात गेल्यावर शिक्षक जो विषय शिकवायचा असेल त्याचे केवळ कथन करतो आपले कथन कितपत योग्य झाले आहे व मुलांना ते कितपत कळेले आहे याचा उपयोग प्राचीन काळापासून होत आला व आताही होत आहे. परंतु ही पद्धती फक्त लहान मुलांसाठीच थोडी उपयुक्त ठरू शकते त्याचप्रमाणे महाविद्यालयीन स्तरावर काहीशी उपयुक्त ठरू शकते. या कथन पद्धतीचे प्रभावी अध्ययन होण्याकरिता खालील उपक्रम करता येतील :

(1) कथाकथन स्पर्धा

(2) टेपरेकॉर्डरचा वापर

(3) कथनाचे नियम

(4) व्याख्यानाचे आयोजन

(5) प्रसंगाचे वर्णन

(6) कथापूर्ती स्पर्धा

(7) कथनात्मक निबंध स्पर्धा

(8) वाचनालयाचे तास व चर्चासत्र

(9) चित्रावरून कथा तयार करणे.

(10) प्रभावी कथाकरांच्या कथा ऐकविणे.

(3) **पाठ्यक्रम व अभ्यासक्रम यांच्यातील फरक स्पष्ट करा :** 4

| **अभ्यासक्रम** | **पाठ्यक्रम** |
|---|---|
| (1) अभ्यासक्रमास इंग्रजीमध्ये Curriculum म्हणतात | (1) पाठ्यक्रमास इंग्रजीमध्ये Syllabus म्हणतात. |
| (2) अभ्यासक्रम स्तरानुरूप असतो. | (2) प्रत्येक विषयाची क्रमबद्ध आखणी |
| (3) सहशालेय कार्यक्रमाचा समावेश केलेला असतो. | (3) पाठ्यक्रम इयत्तानुरूप असतो. |
| (4) व्यापक स्वरूपात असतो. | (4) फक्त विषयांचा समावेश केलेला असतो. |

| | |
|---|---|
| (5) विद्यार्थी क्षमतेचा विचार नसतो. | (5) मर्यादित स्वरूपात असतो. |
| (6) विकासाच्या अवस्थांचा विचार केलेला नसतो. | (6) मानसिक बौद्धिक भाषिक व सामाजिक क्षमतांचा विचार केलेला असतो. |
| (7) शैक्षणिक साहित्य अध्ययन अनुभूती यांची नोंद नसते. | (7) शैक्षणिक अनुभव अध्ययन अनुभूती यांची नोंद असते. |
| (8) अभ्यासपूरक उपक्रमांची सूची नसते. | (8) अभ्यासपूरक उपक्रमांची सूची असते. |
| (9) अभ्यासक्रमाचा कालावधी दीर्घ असतो. | (9) पाठ्यक्रमाचा कालावधी एक वर्षाचा असतो. |
| (10) अभ्यासक्रम व्यापक असतो. | (10) पाठ्यक्रम त्याचे एक अंग असते. |

**यू ट्यूब, ब्लॉग, ॲप्सचा वापर शैक्षणिक साधन म्हणून अध्यापनात कसा कराल ? ते लिहा.**

(1) **यू-ट्यूब** – बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षणक्षेत्रातही वैज्ञानिक क्रांती झाली आहे. संगणक, मोबाईल, गूगल यांचा शिक्षणात वापर होऊ लागला आहे. अशा युगात यू-ट्यूबचाही शैक्षणिक साहित्य म्हणून वापर करता येतो.

(2) **ब्लॉग** – ब्लॉग म्हणजे स्वत:ची वेगळी विशिष्ट असलेली वेबसाइट. वेबसाइट बनविण्यासाठी डिझाइन, ले-आऊट, आराखडा, लिंक्सची रचना इ. चा विचार करावा लागतो. पण ब्लॉग बनविणे सोपे असते.

(3) **ॲप्स** – ॲप्सचा मराठी अध्यापनात उपयोग करता येतो. प्राथमिक, माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी वेगवेगळे ॲप्स उपलब्ध आहेत.

(अ) **मराठी किड्स ॲप्स** – या ॲप्समधून मराठी, इंग्रजी वर्णमाला, महिन्यांची नांवे, रंग, आकार, प्राणी, भाज्या, फळे, फुले यासारखी विविध माहिती विद्यार्थ्यांना देता येते.

(ब) **गूगल ड्राईव्ह** – या ॲप्समधून विविध प्रोग्राम पाहायला मिळतात.

(क) **दी होमवर्क ॲप्स** – विद्यार्थ्यांचा गृहपाठ, स्वाध्याय पूर्ण करण्यासाठी या ॲप्सचा उपयोग करता येऊ शकतो.

(4) **चाचणीचे व्यवस्थापन कसे करावे लागते ? स्पष्ट करा :** 3

चाचणीचे व्यवस्थापन करतांना खालील गोष्टींचा विचार करावा लागतो :

(1) **प्रश्नप्रकारानुसार चाचणीचे विभाजन** – आवश्यकता वाटल्यास चाचणीचे दोन भाग केले जातात.

पहिल्या भागामध्ये वस्तुनिष्ठ प्रश्नांचा, तर दुसऱ्या भागामध्ये दीर्घोत्तरी व लघुत्तरी प्रश्नांचा समावेश केला जातो.

(2) **विद्यार्थ्यांना आवश्यक तेथे सूचना देणे** – प्रश्नपत्रिकेच्या सुरुवातीला सर्वसामान्य स्वरूपाच्या सूचना द्याव्यात, तसेच प्रश्नाला असणारे गुण, उत्तराची व्याप्ती यासंबंधी सूचना माहिती असावी.

(3) **चाचणीसाठी लागणारा वेळ निश्चित करणे** – 20 ते 25 गुणांच्या चाचणीसाठी 30 ते 45 मिनिटे एवढा वेळ देण्यास हरकत नाही. सर्व विद्यार्थ्यांना प्रश्न वेळेत सोडविता यावेत, अशा दृष्टिकोनातून वेळ निश्चित करावा.

(4) **वैकल्पिक पर्यायी प्रश्नांची तरतूद करणे** – प्रश्नांना सरसकट विकल्प देण्याऐवजी अंतर्गत विकल्प दिल्यामुळे विद्यार्थ्यांना सर्वच अभ्यास क्रमावरचे प्रश्न सोडवावे लागतात.

(5) **गुणदान योजना व उत्तरसूची** – विविध परीक्षकेच्या उत्तरपत्रिका तपासणीत एकसूत्रता यावी म्हणून गुणदान योजना व नमुना उत्तरसूची प्राश्निकाने करावी.

(6) **चाचणीचे व्यवस्थापन** – व्यवस्थापनामध्ये चाचणीचा, छपाईचा खर्च, परीक्षेचा दिनांक व वेळ, पर्यवेक्षणाची व्यवस्था, परीक्षेसाठी वर्ग, याकडे लक्ष द्यावे.

**4. खालील प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहा. (प्रत्येकी *200* ते *250* शब्दांत) : 12**

(1) **अध्ययन अध्यापन प्रक्रिया व वातावरण निर्मिती या तिन्ही बाबी एकमेकांवर कशा अवलंबून असतात ? ते स्पष्ट करा :** 4

अध्यापन म्हणजे शिकविणे-अध्ययन म्हणजे शिकणे ह्या दोन्हीं क्रिया परस्परपूरक आणि आंतरक्रियात्मक आहेत पण त्यासाठी पोषक वातावरणाची गरज असते. त्यामुळे ह्या तिनही क्रिया एकमेकांवर अवलंबूनच आहेत :

(1) अध्ययन हे सहेतूक असते.

(2) अध्ययन हे कृतिद्वारे घडत असते.

(3) अध्ययन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे.

(4) अध्ययनामुळे आकलन होते.

(5) सर्वांचे अध्ययन एकसारखे नसते.

विद्यार्थांला शिकण्यासाठी प्रवृत्त, प्रेरित करणे म्हणजे अध्यापन होय.

(1) अध्यापन ही शिक्षक व विद्यार्थी यांच्यात विषयाशी संबंधित घडून येणारी प्रक्रिया होय.

(2) अध्यापन अध्ययनास गतिमान करणारी प्रक्रिया होय.

(3) अध्यापनातून अध्ययनासाठी योग्य वातावरण निर्माण करावे लागते.

(4) अध्यापनात शिक्षकाला विद्यार्थ्यांसमोर साहित्य, प्रसंग, संधी, सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतात.

अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत विविध तंत्रे, साधने, शैली यांचा उपयोग करून अध्ययनासाठी पोषक वातावरण शिक्षकाला तयार करावे लागते. अध्यापनात नवनवीन ज्ञान, कौशल्ये, मुळांचे विचार, यांचा विकास करण्यासाठी वातावरण घटक महत्त्वाचा आहे.

(1) लहान मुले सभोवतालचे जग हळूहळू आकलन करून घेतात.

(2) मुले वातावरण किंवा परिसरातील जग हळूहळू आकलन करून घेतात.

(3) मुळे आव्हाने स्वीकारत नवनवे घटक शिकतात.

(4) विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर कुटुंबातील वातावरणाचा प्रभाव पडतो.

(5) कौटुंबिक वातावरणामुळे बालकाच्या स्वभावाची जडणघडण होते.

(6) शाळा, घर, समाज ही वातावरणाची महत्त्वाची केंद्रे आहेत.

(7) कौटुंबिक वातावरणातील कमतरता शालेय वातावरणाने भरून निघते.

(8) सामाजिक वातावरणातूनही अध्ययन घडत असते.

(9) समाजातील सांस्कृतिक वातावरणाचा सुपरिणाम विद्यार्थ्यांवर दिसून येतो.

(10) सद्गुणी मित्रांच्या वातावरणाचा सुपरिणाम होतो. शिक्षकांनी शिकवू नये तर शिकण्यास सुयोग्य वातावरण निर्माण करावे.

(2) **प्रश्नपद्धती म्हणजे काय ? तिचे महत्त्व, वैशिष्ट्ये व मर्यादा लिहा :** 4

प्रश्नपद्धती ही अध्यापनाची आत्मा आहे असे म्हणतात. कारण पद्धती कोणतीही असली तरी प्रश्नांचा वापर करणे भाग आहे. शिक्षकाची तर ती फार आवडणारी पद्धती आहे.

(1) जेव्हा लिपी नव्हती, छापखाने नव्हते म्हणजे पुस्तके नव्हती, तेव्हा ऋषी आपल्या विद्यार्थ्यांना याच पद्धतीने शिकवीत होते. म्हणजे ही पद्धती फार जुनी आहे.

(2) शिक्षण पद्धतीत प्रश्न विचारणे महत्त्वाचे उपयुक्त साधन आहे. शिक्षक केवळ कथन करीत बसला, तर विद्यार्थी निष्क्रिय होतील व मग ते खोड्या करतील, वाटेल ती चित्रे काढतील, काय करतील हे सांगता येत नाही पण ते लक्षपूर्वक ऐकणार नाहीत हे खरे म्हणून प्रश्नांमुळे मुले सक्रिय होतील. प्रश्नांमुळे विचारांना गती मिळते व त्यांची विचारप्रक्रिया सुरू होते. पाठात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढतो.

(ब) प्रश्नाचे प्रकार :

(1) **बद्ध प्रश्न** – ज्या प्रश्नाचे उत्तर विचार करून सांगावे लागते त्याला मुक्त प्रश्न म्हणतात अध्यापनात मुक्त म्हणजे विचारप्रवर्तक प्रश्नांची संख्या जास्त असावी, विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार प्रश्नांची रचना करावी. प्राथमिक स्तरावर निम्नस्तरीय, तर उच्च प्राथमिक स्तरावर अधिक प्रश्न वैशिष्ट्ये :

(1) पाठाच्या प्रत्येक पायरीवर प्रश्न पद्धती उपयुक्त ठरते.

(2) प्रस्तावनेत शोधक प्रश्न विचारून विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान तपासता येते.

(3) विद्यार्थ्यांना पाठ्यांशाचे आकलन झाले किंवा नाही हे पाहता येते.

(4) संकलन व उपयोजन पायरीवरील प्रश्नामुळे ज्ञानाचे दृढीकरण होते.

(5) या पद्धतीमुळे विद्यार्थांची विचारशक्ती वाढते.

(6) या पद्धतीमुळे विद्यार्थ्यांचे पाठाकडे अवधान केंद्रित करता येते.

मर्यादा –

(1) विद्यार्थी निष्काळजीपणे उत्तरे देतात. तसेच अर्धवट उभी राहतात. अर्धवट वाक्यरचना करताना सांघिक उत्तरे देतात. या कृतीकडे, प्रत्येकाच्या कृतीकडे लक्ष देऊन उत्तरे अचूक करण्यात वेळेचा अपव्यय होतो.

(2) वर्गातील केवळ हुशार विद्यार्थी उत्तरे देतात. त्यामुळे इतर विद्यार्थ्यांचे पाठाकडे दुर्लक्ष होते. त्यासाठी प्रश्न सर्व मुलांना द्यावेत. उत्तर न देणाऱ्या मुलांनाही प्रश्न विचारावेत.

(3) संपूर्ण वर्गाचे अवधान केंद्रित करणे अवघड जाते.